# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दिनांक ०३/११/२०१८

## सभा सुचना क्रं. ११ स. ११.३० वा.

| अु क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | मागील मा. स्थायी समिती सभा दि.२३/१०/२०१८ रोजींचे इतिवृत्त कायम करणे. | ठराव :- दि. २३/१०/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करण्यांत येत आहे<br>अनुमोदक :- मा.श्री.अतुल साळुंखे सूचक :- मा.श्रीम. सुषमा लोपीस<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| २. | प्रभाग समिती अ मधील विरार (प.) प्रभाग क्र.३३ मध्ये बोळींज सर्वे क्र. ४०४ जवळील नाल्यामध्ये संरक्षक भिंतीचे बांधणे या कामी प्रशासकिय व वित्तीय मंजूरी मिळणे बाबत. | ठराव :- सदर कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम रू. ५०,६२,६४५/- या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे व सदर कामी ई-निविदा दर मागविण्यांत यावेत असे ही सभा ठरविते.<br>अनुमोदक :- मा.श्री. किशोर ना.पाटील सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ३. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) प्रभाग क्र.८१ मधील संयुक्त नगर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याचे नुतनीकरण व सुशोभिकरण करणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सादर केलेल्या प्रस्तावावर सांगोपांग चर्चा करण्यांत आली. सन्मा. सदस्य यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांवर तसेच कायदेशीर बाबींची पडताळणी करून तद्नंतर पुनःश्च प्रस्ताव सादर करावा. या सभेत हा विषय स्थगीत ठेवणेंत यावा असे ही सभा ठरविते.<br>अनुमोदक :- मा.श्री.दिलीप गोवारी सूचक :- मा.श्री. स्वप्नील बांदेकर<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ४. | प्रभाग समिती सी मधील विरार (पू) प्रभाग क्र.९ मध्ये गोसीया मस्जीद, इदगाह मैदान येथे शेडचे बांधकाम करणे कामी प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | ठराव :- तरी सदर कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम रु. ५३,५६,५८५/- या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे व सदर कामी ई-निविदा प्रक्रियेद्वारे निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते.<br>अनुमोदक :- मा.श्री.कल्पेश मानकर सूचक :- मा.श्री.पंकज ठाकूर<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ५. | वसई विरार शहर महनगरपालिका प्र.क्र१८ मधील महानगरपालिका वाचनालय इमारतीचे नूतनीकरण करणेकामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेबाबत. | ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विरार पूर्व टोटाळे तलाव येथे महानगरपालिका वाचनालयाची G+3 मजली इमारत आहे. सदर इमारतीचे नुतनीकरण तसेत अद्यावत वाचनालय व अभ्यासिका उभारणेसाठी रु. ७३,२७,९९३/- (अंदाजित) इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करणेंत आले असून, त्यात Water-proofing, flooring, Plaster, Painting, false celing, G-1 sheet roofing, structural glazing, door & window sills, sanitary fittings, partition, doors, alluminiumwindows, study banches, storages, chairs इ. बाबींचा समावेश केलेला आहे, तसेच ह्याकामी होणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. नितीन राऊत सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर<br>ठराव सर्वानुमते मंजूर |

| | | |
|---|---|---|
| ६. | प्रभाग समिती सी मधील विरार (पू.) प्रभाग क्र.९ मध्ये गोसीया मस्जीद, इदगाह मैदान येथे चेंजींग रुम, स्टोअर रुम व शौचालयाचे बांधकाम करणे कामी प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | **ठराव :-** तरी सदर कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम रू. १९,०८,२८६/- या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे व सदर कामी ई-निविदा प्रक्रियेद्वारे निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते.<br>**अनुमोदक :- मा.श्री.अतुल साळुंखे सूचक :- कल्पेश मानकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ७. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या काशिद कोपर **MBR** कडे जाणाऱ्या पोहोच रस्त्याला खडीकरण व डांबरीकरणे करणे कामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यास व पुढील निविदा कार्यवाही करण्यांस ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री.वैभव पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ८. | प्रभाग समिती एफ धानिव/पेल्हार क्षेत्रातील प्रभाग क्र.४१ मधील डोंगरपाडा येथे गल्ली क्र.१,४ व ५ मध्ये रस्ता खडीकरण करणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत कामाला प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** सदर प्रस्तावाबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. त्यानुसार सदर काम करणेंस व सदर कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कम रू. २४६२७३१/- इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. सदर कामी विहीत प्रणालीनुसार निविदा दर मागविणेंस व त्याअनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ९. | प्रभाग समिती एफ पेल्हार वॉर्ड क्र. ४३ मधील सोपाराफाटा येथील जाबरपाडा ते सागपाडा अंतर्गत रस्ता खडीकरण करणे कामाला प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** सदर विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार सदर काम करणेसाठी केलेल्या खडीकरणाच्या तरतुदीऐवजी वेटमिक्स मॅकेडम वापरून अंदाजपत्रक तयार करावे व त्यानुसार येणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. सदर कामी विहीत प्रणालीनुसार नविदा मागविण्यास व त्याअनुषंगाने येणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री.पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १०. | प्रभाग समिती एफ धानिव/पेल्हार क्षेत्रातील प्रभाग क्र.४० मधील काशी विश्वनाथ मंदीर ते मुख्य नाल्यापर्यंत पाईप गटार बांधणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत कामाला प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** सदर विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. सदरच्या अंदाजपत्रकात गणितीय चुक झाली असल्याने सदर कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कमेत फरक झाला असून अंदाजपत्रकीय रक्कम रू. ५६०१०५४/- च्या ऐवजी रक्कम रू. १८२६९८८/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. सदर कामी विहीत प्रणालीनुसार नविदा मागविण्यास व त्याअनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.वैभव पाटील सूचक :- मा.श्रीम.दिक्षा घरत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| ११. | प्रभाग समिती एफ धानिव /पेल्हार क्षेत्रातील प्रभाग क्र.०५ पेल्हार नाका ते पेल्हार महानगरपालिका कार्यालयापर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत कामाला प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार सदर काम करण्यासाठी केलेल्या खडीकरणाच्या तरतुदीऐवजी वेटमिक्स मॅकेडम वापरुन अंदाजपत्रक तयार करावे व त्यानुसार येणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. सदर कामी विहीत प्रणालीनुसार नविदा मागविण्यास व त्याअनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. दिलीप गोवारी सूचक :- मा.श्री.पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १२. | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी डिजीटल वॉल पेन्टींग (LEBC) द्वारे जनजागृती करणे. | ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये डिजीटल वॉल पेन्टीग (LEBC) द्वारे जनजागृती करणे कामी होणाऱ्या एकूण रू. ६५,८८,२२३,९०/- इतक्या रक्कमेस तसेच मंजूर निविदाधारक मे.केन इमेज मिडीया टेक यांना सदर कामाचा कार्यादेश देणेकरीता मा.स्थायी समिती सभा मान्यता देत आहे. असे ही सभा ठरविते आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री. किशोर ना.पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १३. | सन २०१८-१९ ते सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दुभाजकांची देखभाल दुरुस्ती,संगोपन व नव्याने तयार होणाऱ्या दुभाजकांचे सुशोभिकरण करणेकामी मे. ॲस्थेटिक लॅण्डस्केपिंग यांना मंजूर दराने काम देणेस व येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- उपरोक्त विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेंत आली. मंजूर निविदाधारक मे. ॲस्थेटिक लॅण्डस्केपिंग यांना दुभाजकांची निगा व देखभाल तसेच नव्याने तयार झालेल्या दुभाजकांचे सुशोभिकरण व देखभाल या कामाचा दि. ३१ मार्च २०२१ या कालावधीपर्यंत कार्यादेश देणेस व सन २०१८-१९ या वित्तीय वर्षात होणाऱ्या रक्कम रू. ६२,७८,९४९/-(अक्षरी रू. बासष्ट लक्ष अठ्ठ्याहत्तर हजार नऊशे एकोणपन्नास रू. मात्र) इतक्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.पंकज पाटील सूचक :- मा.श्री.कल्पेश मानकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १४. | सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामधील तरतुदीच्या पुर्नविनियोजनास मंजुरी मिळणेबाबत. | ठराव :- उपरोक्त विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेंत आली. सदर चर्चेनुसार दुभाजक सुशोभिकरण व वृक्षप्राधिकरण बियाणे व रोपे खरेदी व रोपवाटीका खर्च या लेखाशिर्षकातुन वृक्षरोपन/उद्यान देखभाल या लेखाशिर्षकात रक्कम रू. १,९०,००,०००/- वर्ग करणेंस व सदर पुर्नविनियोजनाच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर ना.पाटील सूचक :- मा.श्री.वैभव पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १५. | प्रभाग समिती एफ, (जुना-ब), पेल्हार हद्दीतील वालईपाडा येथे बाबू बांगड यांच्या घराजवळ स्मशानभुमी बांधणे काम रद्द करणेबाबत. | ठराव :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन प्रभाग समिती एफ, (जुना-ब), पेल्हार हद्दीतील वालईपाडा येथे बाबू बांगड यांच्या घराजवळ स्मशानभुमी बांधणे काम रद्द करणेबाबत सदरचे काम रद्द करुन संबंधित कामाची इसारा सुरक्षा अनामत रक्कम ठेकेदारास अदा करणेच्या ठरावास मंजूरी देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.पंकज पाटील सूचक :- मा.श्री.दिलीप गोवारी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| १६. | प्रभाग समिती एफ, (जुना-ब) पेल्हार हद्दीतील वालईपाडा मुख्य रस्ता येथे जनार्दन स्मृती समोरील रस्त्याच्या बाजुस संरक्षण भिंत बांधणे काम रद्द करणेबाबत. | ठराव :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन प्रभाग समिती एफ, (जुना-ब) पेल्हार हद्दीतील वालईपाडा मुख्य रस्ता येथे जनार्दन स्मृती समोरील रस्त्याच्या बाजुस संरक्षण भिंत बांधणे काम रद्द करणेबाबत सदरचे काम रद्द करुन संबंधित कामाची इसारा सुरक्षा अनामत रक्कम ठेकेदारास अदा करणेच्या ठरावास मंजूरी देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.पंकज पाटील सूचक :- मा.श्री.दिलीप गोवारी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १७. | वसई विरार शहर महानगरपालिका मुख्यालय प्रभाग समिती इतर कार्यालय यांना संगणक संच यु.पी.एस, प्रिंटर व स्कॅनर तसेच इतर संगणकीय साहीत्य पुरविणे कामी GEM गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेसच्या माध्यमातून ऑनलाईन निविदा प्रकियेद्वारे खरेदी करणेबाबत. | ठराव :- सदरबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. याकामी संगणकीय साहित्यांमधील स्कॅनर व प्रिंटर वगळून ३८ संगणक, ४ लॅपटॉप, ४५ युपिएस व २ पोर्टेबल हार्डडिक्स GEM पोर्टलद्वारे खरेदी करण्यास व होणाऱ्या खर्चास ही सभा मान्यता देत आहे. तसेच आजतागायत खरेदी केलेल्या संगणकाचा सविस्तर अहवाल व प्रिंटर, स्कॅनर लॅन कनेक्शनद्वारे शेअरींग करून वापरणेबाबत कार्यवाही करून त्याचा अहवाल मा.स्थायी समिती समोर पुनश:च सादर करावा.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.विद्या पाटील सूचक :- मा.श्री.अतुल साळुंखे**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १८. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प) वॉर्ड क्र.५३ मधील गुलमोहर समोरील रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर कामास मा.स्थायी समिती ठराव क्र. ११८ दि. २८/०४/२०१७ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्दी करून सकारात्मकदृष्ट्या मे.माता जिवदानी कन्स्ट्रक्शन यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (-) ११.००% कमी दराने निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा.आयुक्तांच्या शिफारशीनुसार संविदा करणेंस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अफीफ शेख सूचक :- मा.श्री.नितीन राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १९. | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प) वॉर्ड क्र.५८ मधील हनुमान नगर टर्न ते पारस अपा. पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर कामास मा.स्थायी समिती ठराव क्र. १३८ दि. २८/०४/२०१७ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्दी करून सकारात्मकदृष्ट्या मे.एस.एम.डेव्हलपर्स यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (-) ९.५५% कमी दराने निविदा लघुत्तम आहे. परंतु सदर ठेकेदाराने महाराष्ट्र शासन साबांवि/शासन निर्णय क्र. बीडीजी २१६/प्र.क्र.२/इसा.२, मंत्रालय दि. १२/०२/२०१६ च्या निर्णयाप्रमाणे परफॉर्मन्स सिक्युरीटी धनाकर्ष सादर केला नसल्याने मे. एस.एम.डेव्हलपर्स यांची निविदा अपात्र ठरत असून फरफॉमन्स सिक्युरेटी धनाकर्ष सादर केलेल्या द्वितीय लघुत्तम निविदाधारक मे तिर्थराज कन्स्ट्रक्शन यांची ८.९% कमी दराची निविदा तुलनात्मकरीत्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व योग्य आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा.आयुक्तांच्या शिफारशीनुसार संविदा करणेंस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री.नितीन राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| २०. | प्रभाग समिती जी मधील वॉर्ड क्र.९० (जुना ६३) मध्ये कोल्ही येथे चिंचोटी ब्रीज ते ज्ञानोद्य शाळेपर्यंत आर.सी.सी. संरक्षक भिंत बांधणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे. भोईर कन्स्ट्रक्शन यांची निविदा १०.९०% कमी दराने सर्वात कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देणेकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार संविदा करणेंस तसेच येणाऱ्या अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.कल्पेश मानकर सूचक :- मा.श्री.दिलीप गोवारी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २१. | सदानंद सुर्वे यांच्या पत्नी सौ.स्नेहा सदानंद सुर्वे यांचे वैद्यकीय बिलाची प्रतीपुर्ती करुन मिळणे बाबत. | ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्यालय येथील सदानंद सुर्वे, सहाय्यक आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग यांच्या पत्नी सौ. स्नेहा सदानंद सुर्वे यांच्यावर खालील कालावधीत तातडीच्या प्रसंगी सोमय्या आयुर्विहार, एशियन कॅन्सर इन्स्टिटयुट, सायन, मुंबई येथे दिनांक ३/०९/१७ ते ०९/०९/१७ व ०२/०१/१८ ते ०४/०१/१८ पर्यंत अंतरुग्ण दाखल करुन त्यांचेवर औषधोपचार करुन घेतलेले आहे. तसेच दि. १२/०७/२०१७ ते दि. २/०९/२०१७ व दि. १०/०९/२०१७ ते दि. २०/०३/२०१७ पर्यंत बाहयरुग्ण औषधोपचार करण्यात आला आहे. सदर कामी श्री. सदानंद सुर्वे, सहाय्यक आयुक्त यांना एकुण रक्कम रु. ९,८५०८५/- **(अक्षरी - नऊ लाख पंच्याऐंशी हजार पंच्याऐंशी मात्र)** वैद्यकीय खर्चापोटी झालेला खर्च अदा करणेस आजची ही सभा वित्तीय व प्रशासकिय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. नितीन राऊत सूचक :- मा.श्री.कल्पेश मानकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २२. | वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दिनांक २३/०७/२०१८ ते दिनांक ०७/१०/२०१८ या कालावधीत झालेल्या आगी व झालेल्या दुर्घटनांचे प्रतिवृत्त स्थायी समितीच्या माहितीसाठी. | ठराव :- प्रस्तावात नमुद केलेनुसार उक्त कालावधीत लागलेल्या आगी व झालेल्या दुर्घटनेचे प्रतिवृत्त जे माहितीसाठी सभेस दिलेले आहे, त्याचे सभेने अवलोकन केले व त्यास ही सभा एकमताने मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.पंकज ठाकूर सूचक :- मा.श्री.उमेश नाईक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २३. | वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती जी अंतर्गत येणाऱ्या जूचंद्र विभागात भरणार दैनंदिन बाजार व आठवडा बाजार शुल्क वसुलीचा सन २०१८-१९ चा वार्षिक ठेक्यास (ई-निविदा) प्रभासकीय व आर्थिक मंजुरी मिळणेबाबत. | ठराव :- सदर प्रस्तावावर साधक-बाधक चर्चा करणेंत आली. मा.स्थायी समिती सभेच्या निर्णयानुसार बाजार वसुली दराच्या पुर्नविलोकनाबाबत अभ्यास गट स्थापन करण्यांत आला असून त्याचा अहवाल अंतिम टप्प्यात आहे. तथापि नवीन बाजार धोरण जरी निश्चित झाले. तरीही वर्षाच्या अंति टप्प्यात असल्याने बहुतांश बाजाराच्या स्थायी समितीच्या मंजूरीनुसार ई-निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्या आहेत किंवा चालू आहेत त्यामुळे जूचंद्र बाजार क्षेत्र हे ग्रामिण भागात मोडत असल्याने प्रचलित दरानुसार बाजार कर ई-निविदा काढणे उचित राहिल. सबब बाजार वसुलीकरीता व महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान टाळणेकरीता तुर्तास बाजारकर वसुली करीता सन २०१८-१९ वर्षाकरीता १०% वाढीने निश्चित केलेल्या रक्कमेवर ई-निविदा मागविणेस वृत्तपत्रात जाहीर ई-निविदा नोटीस प्रसिध्द करणे व तोपर्यंत निश्चित केलेल्या रक्कमेची १०% वाढीने वसुली करणेकरीता पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्याने सद्याच्या मंजूर ठेकेदारास ३१/०३/२०१९ अखेरपर्यंत मुदतवाढ देणेस ही सभा प्रशासकीय वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अतुल साळुंखे सूचक :- मा.श्री.कल्पेश मानकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २४. | वसई विरार शहर महानगरपालिका, अण्णासाहेब वर्तक महाविद्यालय आणि साहित्य जल्लोष | ठराव :- वरील विषयावर स्थायी समिती सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार वसई-विरार शहर महानगरपालिका विद्यावर्धिनी संस्थेचे अण्णासाहेब वर्तक महाविद्यालय आणि साहित्य जल्लोष प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. ७ ऑक्टोंबर २०१८ रोजी सकाळी १०.०० ते रात्री ८.०० या वेळेत अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयातील के.सी.राजाणी सभागृहात साहित्य जल्लोष हा कार्यक्रम |

D:/Standing Comm/Tarav

| | | |
|---|---|---|
| | प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित साहित्य जल्लोष या कार्यक्रमाचे देयक अदा करणेकामी होणाऱ्या वाढीव खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत. | आयोजित करण्यांत आला होता. त्यासाठी स्थायी समितीची सभा दि. २६/०९/२०१८ ठराव क्र. २७६ अन्वये रक्कम रु. ८,००,०००/- (आठ लक्ष रु. मात्र) इतक्या खर्चास प्रशासकीय वित्तीय मंजूरी घेतलेली होती. परंतु सदर कार्यक्रमाची प्रसिध्दी व्यापक प्रमाणात करण्यांत आलेली होती. त्यामुळे कार्यक्रमात अधिक संख्येने जनसमुदाय (दुप्पट) प्रत्यक्षात उपस्थित राहिला. आयत्यावेळी त्यांची खानपान व्यवस्था (चहा, कॉफी, नाश्ता, भोजन व पाणी) व आसन व्यवस्था (खुर्च्या) करावी लागली. तसेच कार्यक्रमाची व्यापक प्रसिध्दी पाहता कार्यक्रमाच्या एक दिवस आधी संपुर्ण कार्यक्रमाचे केबल टि.व्ही.वर थेट लाईव्ह प्रक्षेपण करण्याचे ठरले. कार्यक्रमाच्या ठिकाणी रांगोळी काढणे, ग्रंथ प्रदर्शन भरविणे या व इतर अनुषंगिक बाबींवर रक्कम रु. ३,७८,३३२/- इतका वाढीव खर्च प्रत्यक्षात झालेला आहे. त्यामुळे कार्यक्रमासाठी दि. २६/०९/२०१८ ठराव क्र. २७६ अन्वये मा.स्थायी सभेने मंजूर केलेला रक्कम रु. ८,००,०००/- इतका निधी अपुरा पडलेला आहे. सदर कार्यक्रमासाठी झालेला प्रत्यक्ष खर्च पाहता सर्व मंजूर ठेकेदारानी पुरवठा केलेल्या साहित्याचे देयक अदा करण्यासाठी अजून रक्कम रु. ३,७८,३३२/- लक्ष इतक्या वाढीव खर्चास आजची स्थायी समितीची सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. नितीन राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २५. | वसई विरार शहर महानगरपलिकेमध्ये विवक्षित कामकाजासाठी नेमणूक केलेल्या कर्मचाऱ्यास मुदतवाढ देणेबाबत. | ठराव :- मा. स्थायी समिती सभा, ठराव क्र. ०२, दि. ३/०४/२०१७ नुसार कार्यालयीन आदेश क्र. वविशम/आस्था/११३२/१७-१८, दि. १९/०१/२०१८ अन्वये श्री. विश्वनाथ काशीनाथ पिंपळे, हे सेवानिवृत्त,गट विकास अधिकारी असून त्यांना घरकुल योजनेच्या कामाचा अनुभव असल्याने त्यांना पंतप्रधान आवास योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी मासिक पारिश्रमीक रक्कम म्हणून निवृत्ती वेतनाची रक्कम + महागाई भत्ता मिळून होणारी रक्कम रु. २९७७०/- (अक्षरी रु. एकोणतीस हजार सातशे सत्तर मात्र) या वेतनावर शासन निर्णय दि. १७/१२/२०१६ नुसार महानगरपालिकेमध्ये नियुक्ती करण्यात आली आहे. श्री. पिंपळे यांची मुदत दि. १८/०६/२०१८ रोजी संपलेली आहे. पंतप्रधान आवास योजनेच्या अंमलबजावणी करीता व कामाची निकड पाहता एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन श्री. विश्वनाथ काशीनाथ पिंपळे यांना दि. २०/०६/२०१८ पासुन दि. १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयानुसार मासिक पारिश्रमिक तत्वावर मुदतवाढ देणेस व त्याचे मासिक पारिश्रमिकापोटी होणाऱ्या खर्चास आजची ही सभा प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. दिक्षा घरत सूचक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २६. | वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील स्मशानभूमी करीता जळाऊ लाकडे खरेदी करणेकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- उपरोक्त विषयावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरविण्यांत आले की, वनविकास महामंडळ महाराष्ट्र लि.यांच्या मार्फत जळाऊ लाकडे उपलब्ध होत असल्याने महानगरपालिकेची गैरसोय निर्माण होत असून आवश्यकतेनुसार बाजारातुन लाकडे खरेदी कामी सादर केलेल्या प्रस्तावास आर्थिव व प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. सदर कामी बी-२ प्रकारची निविदा मागविण्यास तसेच सदरची निविदा मंजूर होवून कार्यादेश देईपर्यंत कोटेशन पध्दतीचा अवलंब करुन लाकडे खरेदी कामी येणाऱ्या खर्चास ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अतुल सांळुखे सूचक :- मा.श्रीम.कल्पेश मानकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| २७. | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या प्रकरण ९ व कलम ९४ मधील तरतुदीनुसार सन २०१७-१८ ची वार्षीक लेखा विवरणपत्रे मा.स्थायी समिती सभेपुढे सादर करणे. | ठराव :- सन २०१७-१८ वित्तीय वर्षाच्या जमा-खर्चास वार्षिक लेखे व सहपत्रे मान्य करुन ठरावाचे प्रतीसह प्रसिध्द करणेस व प्रस्तावित प्रमाणे विक्रीसाठी उपलब्ध करणेस प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री.अफिफ शेख सूचक :- मा.श्री.नितीन राऊत<br>ठराव सर्वानुमते मंजूर |

नगरसचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका